सन २०१७-१८ करिता कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-वाणिज्यिक पिकांकरीता (कापूस, ऊस) ₹ १५.५५ लाख निधी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : असुअ-०९१७/प्र.क्र. १११/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २७ ऑक्टोंबर, २०१७

वाचा:-

१. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.2-1/2017 –NFSM दि. ०९.०३.२०१७
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र. १८/ राकृवियो कक्ष, दि.१३.०४.२०१७
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
४. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७
५. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. असूअ ०३१७/प्र.क्र. १३/राकृवियो कक्ष, दि.०६.०५.२०१७
६. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.2-9/2015 –CU-IV, दि. १९.०७.२०१७
७. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. No.२-९/२०१५ CU-IV, दि. २१.०९.२०१७
८. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.११/कार्यासन.६, दि.१७/१०/२०१७
९. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.असूअ ०३१७/प्र.क्र.१३/राकृविया कक्ष, दि.२६/१०/२०१७

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत ऊस व कापूस या वाणिज्यीक पिकांवर आधारीत पिक पध्दतींचा समावेश केला तसेच, सदर अभियानाकरिताकेंद्र शासन राज्य शासनांना अर्थसंकल्पीय तरतूदीद्वारे १००% निधी उपलब्ध करुन देत होते. त्यानुषंगाने सदर अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्यात आली आहे. सदर अभियांतर्गत समाविष्ट पिकांच्या उत्पादन व उत्पादकतेत वाढ करणे, शेत जमिनीची सुपीकता व उत्पादकता वाढविणे, रोजगारांची संधी निर्माण करणे व शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे ही प्रमुख्य उद्दीष्ट आहेत.

केंद्र शासनाच्या संदर्भांकित दि. ०९/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८ करिता या अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरिता राज्य शासनास मंजूर झालेल्या नियत वाटपाच्या (Allocation) मर्यादेत एकूण ₹ ६०४.३३ लाख रकमेचा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनाच्या मंजूरीस्तव सादर केला होता व त्यास केंद्र शासनाने संदर्भांकित दि. १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. सन २०१७-१८ मध्ये कृषि उन्नती योजनेच्या अंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत ₹ ६०४.३३ लाख रकमेच्या कृती आराखडयास संदर्भांकित दि.०६.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांसाठी केंद्र शासनाचा ₹ ३६२.६० लाख व राज्य शासनाचा ₹ २४१.७३ लाख आर्थिक सहभाग अपेक्षित आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरिता (कापूस, ऊस) राज्यास चालू वर्षीच्या वार्षिक कृती आराखडयापैकी (केंद्र हिस्सा ₹ ३६२.६० लाख) केंद्र हिस्स्याचा एकूण ₹ १०४.८५ लाख निधी (सर्वसाधारण, अनुसूचित जाती व जमातींकरीता) संदर्भांकित दि. १९ जुलै, २०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने पहिल्या हफ्त्यामध्ये वितरीत केला आहे. या निधी पैकी केंद्र शासनाने ₹ ९.३३ लाख निधी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी वितरीत केला आहे. आदिवासी विकास विभागाच्या संदर्भाधिन दि.१७ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियानांतर्गत प्राप्त झालेला केंद्र हिस्याचा ₹ ९.३३ लाख व राज्य हिस्याचा ₹ ६.२२ लाख असा एकूण ₹ १५.५५ लाख निधी प्रशासकीय विभाग/ नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरीता प्राप्त झालेला केंद्र हिस्याचा ₹ ९.३३ लाख व राज्य हिस्याचा ₹ ६.२२ लाख असा एकूण ₹ १५.५५ लाख निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरिता (ऊस व कापूस) अनुसूचित जमाती केंद्र व राज्य हिस्स्याचा अनुक्रमे ६०:४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात एकूण ₹ १५.५५ लाख निधी (रुपये पंधरा लाख पंचावन्न हजार फक्त) आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचे पिक निहाय तसेच केंद्र व राज्य हिस्स्याचे विवरण पुढीलप्रमाणे -

(₹ लाख)

अ. क्र.	राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत वाणिज्यिक पिके	अनुसूचित जमाती प्रवर्ग		एकूण वितरीत निधी
		केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	
१.	कापूस	१.२७	०.८५	**२.१२**
२.	ऊस	८.०६	५.३७	**१३.४३**
	एकूण	**९.३३**	**६.२२**	**१५.५५**

२. परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार **कापूस** पिकाकरिता केंद्र हिस्स्याचा ₹ १.२७ लाख निधी (रुपये एक लाख सत्तावीस हजार फक्त) आणि राज्य हिस्स्याचा ₹ ०.८५ लाख निधी (रुपये पंच्याऐंशी हजार फक्त) असा एकूण ₹ २.१२ लाख निधी (रुपये दोन लाख बारा हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.

३. परिच्छेद १ मध्ये नमूद केल्यानुसार **ऊस** पिकाकरिता केंद्र हिस्स्याचा ₹ ८.०६ लाख निधी (रुपये आठ लाख सहा हजार फक्त) आणि राज्य हिस्स्याचा ₹ ५.३७ लाख निधी (रुपये पाच लाख सदोतीस हजार फक्त) असा एकूण ₹ १३.४३ लाख निधी (रुपये तेरा लाख त्रेचाळीस हजार फक्त) वितरीत करण्यात येत आहे.

४. परिच्छेद क्र. १ ते ३ मध्ये नमूद केल्यानुसार, ऊस व कापूस पिकाकरिता अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत केलेला निधी सन २०१७-१८ मध्ये पुढील लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पीय तरतुदीतून खर्ची टाकावा:-

केंद्र / राज्य हिस्सा	लेखाशिर्ष	
	कापूस	**ऊस**
केंद्र हिस्सा	**मागणी क्रमांक टी-५** २४०१- पीक संवर्धन ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२३) कृषी उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- वाणिज्यिक पिके- कापूस (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१ A५७५) ३३, अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक टी-५** २४०१- पीक संवर्धन ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२५) कृषी उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- वाणिज्यिक पिके- ऊस (केंद्र हिस्सा ६०%) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१ A५९३) ३३, अर्थसहाय्य
राज्य हिस्सा	**मागणी क्रमांक टी-५** २४०१, पीक संवर्धन ७९६ - जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२४)- कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - वाणिज्यिक पिके - कापूस (राज्य हिस्सा ४० %) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१ A५८४), ३३, अर्थसहाय्य	**मागणी क्र. टी-५** २४०१, पीक संवर्धन ७९६ - जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (२६)- कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - वाणिज्यिक पिके - ऊस (राज्य हिस्सा ४० %) (केंद्र पुरस्कृत योजना) (२४०१ A६०१), ३३, अर्थसहाय्य

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत वाणिज्यिक पिकांकरिता (ऊस व कापूस) उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य हिस्याच्या ₹ १५.५५ लाख रक्कमेचे जिल्हा निहाय/ कार्यालय निहाय वाटप करण्याकरिता संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांनी अभियानांतर्गत जिल्हा निहाय वाटप करावयाचा निधी अर्थसंकल्पीय वितरण

प्रणालीद्वारे विभागीय कृषि सह संचालकांमार्फत वितरीत करावा. त्याचप्रमाणे संदर्भांकित पत्र दि.२१/०९/२०१७ अन्वये केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या मागील वर्षातील योजनेंतर्गत प्रलंबित देयके (आर्थिक दायित्व) चालू वर्षी अदा करण्याकरिता सदर निधीचा प्राधान्याने विनियोग करावा.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या ₹ १५.५५ लाख निधीचे विविध कार्यालयांच्या स्तरावर कोषागारातून आहरण व वितरणाकरिता खालील अधिका-यांना त्या-त्या स्तरावर नियंत्रण अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे-

अ.क्र.	कार्यालय	नियंत्रण अधिकारी	आहरण व संवितरण अधिकारी
१.	कृषि आयुक्तालय	संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे	सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२.	विभागीय सह संचालक (कृषि)	विभागीय सह संचालक (कृषि)	संबंधित विभागीय सह संचालक (कृषि) यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी
३.	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी
४.	तालुका कृषि अधिकारी	तालुका कृषि अधिकारी	तालुका कृषि अधिकारी

७. केंद्रिय कृषि मंत्रालयाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत सन २०१७-१८ करिता वार्षिक कृती आराखडयास संदर्भांकित दि.०६.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार, तसेच चालू वर्षी अभियानाकरिता मंजूर केलेल्या कृति आराखडयानुसार आणि वेळोवेळी केंद्रीय कृषि मंत्रालयाने दिलेल्या दिशानिर्देशानुसार सदर अभियानाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील, याबाबत संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी राज्यस्तरावरुन अभियानाचे संनियंत्रण करावे, त्याचप्रमाणे अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणाकरिता वेळोवेळी अधिनस्त कार्यालयांना निदेशित करावे.

८. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी / तालुका कृषि अधिकाऱ्यांनी अभियानाकरिता लाभार्थ्यांची निवड करुन अभियानांतर्गत समाविष्ट कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने लाभार्थ्यांची यादी तालुका स्तरावर संकलित करावी. सदर यादीमध्ये शेतकऱ्याचे नांव, गांव, सर्वे/गट क्रमांक या बाबींसह, मोबाईल/दुरध्वनी क्रमांक, बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक इ. बाबीची माहिती संकलित करण्यात यावी. त्याचप्रमाणे अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी निधी प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये कृषि विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांची राहील.

९. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत विविध घटकांतर्गत लाभार्थी शेतकरी निवडतेवेळी अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना वा सदर शेतक-यांच्या गटांना प्राधान्य देण्यात यावे, त्याचप्रमाणे

अभियानांतर्गत वैयक्तिक लाभाच्या सर्व घटकांखाली 'आधार क्रमांकाशी' सांगड घालून थेट लाभार्थ्यांच्या खाती अनुदान जमा करण्याची (Direct Benefit Transfer) कार्यवाही करावी

१०. उन्नत शेती - समृद्ध शेतकरी' या मोहिमेच्या संदर्भांकित दि. १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये तसेच, लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाबाबत (DBT) संदर्भांकित दि. १९ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयांन्वये कृषि विभागाच्या प्रचलित योजनांतर्गत विविध घटकांची अंमलबजावणी कशाप्रकारे करावी याबाबत मार्गदर्शक सूचना विहित केलेल्या आहेत. सदर दोन्ही शासन निर्णयातील सूचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत-वाणिज्यिक पिकांच्या सर्व घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी.

११. सदर लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रामाची प्रत्यक्ष तपासणी त्या-त्या गावातील कृषि सहायकांनी करावयाची असून, त्यांनी आपला अहवाल तालुका कृषि अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांना सादर करावयाचा आहे. त्याचप्रमाणे, कृषि सहायकांचे अहवाल प्राप्त होताच सदर कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या कामांच्या पर्यवेक्षीय तपासणीचे उचित प्रमाण संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी मार्गदर्शक सूचनेमध्ये विहित करावे.

१२. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे. सदर उपयोगिता प्रमाणपत्राच्या आधारे प्रधान सचिव (कृषि) यांच्या स्वाक्षरीने सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास निर्गमित करण्यात येईल.

१३. केंद्र सहाय्यीत योजनकरितानिधी वितरणासाठी वित्त विभागाचे संदर्भाधीन शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७ नुसार विहीत करण्यात आलेल्या अटींची पूर्तता होत आहे सबब, सदर शासन परीपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१३२९५९११०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.27 13:19:06 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
७. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१०.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
११.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१४.सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१५.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
१६.मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७.मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती.